एम एम आर डी ए
MMRDA

जा.क्र.मनिउसं/मुंमप्रविप्रा/ 335 /2020 दिनांक : 13/03/2020.

प्रति,

मा.सदस्य सचिव,

कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती तथा

उपवनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई

उप वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई
आवक क्रमांक 302
दिनांक 18/3/2020
मुख्य लेखापाल उप वनसंरक्षक

**विषय : कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समितीची दि.30/01/2020 रोजी मा.विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली दहावी बैठक.**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येत आहे कि, कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समितीची दहावी बैठक मा.विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली दि.30/01/2020 रोजी मा.विभागीय आयुक्त कोकण विभाग यांचे कार्यालय, जुने सचिवालय, फोर्ट, मुंबई येथे घेण्यात आली.

सदर बैठकीत श्री.रोहीत जोशी यांनी दि.08/12/2019 अन्वये कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समितीकडे रेल्वेलाईन लगत MMRDA चे मंजूर निविदाकार मे.धनलक्ष्मी डेव्हलपर्स यांचे विटाका ते ठाणे स्कायवॉक बांधण्याचे काम सुरु असून सदर कामासाठी लागणारे साहित्य, मशिनरी तयार करणेकामी संबंधीतांमार्फत सदर ठिकाणी भराव घालण्याचे काम सुरु आहे, याबाबत तक्रार केलेली आहे.

याबाबत अभियांत्रिकी विभाग, मुंमप्रविप्रा यांचेकडून पुढीलप्रमाणे अहवाल प्राप्त झाला आहे.

मुंमप्रविप्रामार्फत ठाणे विटावा येथे रेल्वेमार्गास समांतर खाडी भागामध्ये पादचाऱ्यांच्या सुविधेकरता पादचारी पुलाचे काम सन 2017 पासून हाती घेण्यात आले असून सदर कामाचे कंत्राट मे.धनश्री डेव्हलपर्स प्रा.लि. यांना देण्यात आले आहे.

1. पादचाऱ्यांना विटावा गावाहून ठाणे रेल्वे स्थानकापर्यंत उपलब्ध रस्त्याचा वापर करुन पोहचण्यासाठी सुमारे 30 मिनिटांचा वेळ लागतो. सध्या कमीत कमी वेळेत सदर ठिकाणी पोहचण्यासाठी पादचारी रेल्वे मार्गावरुन चालण्याचा धोक्याचा पर्याय निवडतात. वेळ व रिक्षा/बस भाडे वाचविण्यासाठी रेल्वे ट्रॅकवरुन चालत येण्याच्या रेल्वे प्रवाश्यांच्या मानसिकतेमुळे अनेक प्रवाश्यांना आपले प्राण गमवावे लागले आहेत. यासाठी हा प्रकल्प अति महत्त्वाचा आहे. ठाणे विटावा पादचारी पुलाचे काम हे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत हाती घेण्यात आलेले आहे.

2. सदरहू कामासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत वन विभाग, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, ठाणे महानगरपालिका, रेल्वे आणि MCZMZ यांच्याकडून परवानग्या प्राप्त झालेल्या आहेत. सदरहू काम हे खाडी

**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण**
वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०००५१
दू +९१ २२ २६५९ १२३४ ईपीएबीएक्स +९१ २२ २६५९ ०००१ / ४००० फॅ +९१ २२ २६५९ १११२ / १२६४
https://mmrda.maharashtra.gov.in

भागात असल्याने तसेच समुद्रात येणाऱ्या भरती व ओहोटी इत्यादी वेळेची पाणी पातळी लक्षात घेवून व सुरक्षतेची सर्व खबरदारी घेवून करण्यात येत आहे.

3. ठाणे विटावा पाचदारी पुलाचे काम हे रेल्वे ट्रकच्या दक्षिणेला असून तक्रारी मध्ये भराव हा उत्तरेस आहे. भरावाच्या ठिकाणी रेल्वे (एम आर वि सी) (MRVC) चे जिन्याच्या पायाचे काम सुरु आहे व ठाणे महानगर पालिका कळवा स्पोटर्स कॉम्प्लेक्सच्या कामांतर्गत नाल्याचे काम सुध्दा चालू आहे तसेच वाहनधारकांकडून अनधीकृत डेब्रिस व कचऱ्याचे ढीग टाकले जातात.

4. सदरहू ठिकाणी मे. धनश्री डेव्हलपर्स प्रा. लि. यांच्या मार्फत अस्तित्वातील कच्च्या रस्त्याचा वापर साहित्याची ने-आण करण्यासाठी केला जातो. या मार्गाशिवाय दुसरा पर्यायी उपलब्ध नसल्यामुळे नाईलाजास्तव या मार्गाचा वापर केला जातो.

5. सदरहू कामाकरिता कोणत्याही नियमाचे उल्लंघन केलेले नाही किंवा कोणत्याही वृक्षाला हानी पोहचलेली नाही.

(अशोक एन. वाघाये)
नोडल अधिकारी,
कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती
तथा
वरिष्ठ सल्लागार (वने) तथा संचालक,
महाराष्ट्र निसर्ग उद्यान संस्था, मुंबई

सोबत : वरीलप्रमाणे

C:\Users\User\Desktop\MNPS\Letter Related Kandalvan Meeting.docx